# साहित्य अकादमीचा पुरस्कार अद्वैत साळगावकर याला प्रदान

**प्रतिनिधी । गोवन वार्ता**

**पेडणे :** साहित्य अकादमी नवी दिल्ली पुरस्कृत 'युवा साहित्य पुरस्कार २०२४' चा पुरस्कार वितरण वितरण सोहळा दि. १२ रोजी सायंकाळी भुवनेश्वर ओडिशा येथे झाला. कोकणी भाषेसाठी यंदाचा युवा पुरस्कार कोरगावचा सुपुत्र तथा युवा लेखक अद्वैत साळगावकर याने स्वीकारला.

यावेळी साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. माधव कौशिक यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून इंग्रजीतील नामवंत कवी व लेखक जेरी पिंटो उपस्थित होते. तसेच साहित्य अकादमी नवी दिल्लीचे सचिव व उपसचिव व्यासपीठावर उपस्थित होते.




**युवा पुरस्कार अद्वैत साळगावकर याला प्रदान करताना मान्यवर साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. माधव कौशिक.**